महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

प्रति,

अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क,
मुंबई (उपनगर)

क्रमांक एफएलआर - ११२००५/४३४९१/५ब

मुंबई, १५ एप्रिल, २००५

विषय : परदेशातून अधिकृत नोंदणी आधारे आयात केलेल्या व नोंदणीकरणाची मुदत संपल्यानंतर एफएल-१ मधुन विक्री करण्याबाबत.

मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ चा नियम ७ मधील तरतुदीनुसार परदेशातून आयात केलेल्या विदेशी मद्याच्या ब्रॅन्ड व लेबले नोंदणीकरण सदर नियमात विहित केलेले शुल्क भरुन करणे आवश्यक आहे. सदर नोंदणीचे दरवर्षी नुतनीकरण करणे आवश्यक आहे. असे निदर्शनास आले आहे की, काही आयातदार ब्रॅन्ड नोंदणी व लेबल मंजूरी करुन घेऊन आयात करतात मात्र सदर ब्रॅन्डचे पुढे नुतनीकरण करण्यात येत नाही. अशा प्रकरणी शिल्लक असलेला मद्यसाठा विक्रीस परवानगी द्यावी किंवा कसे याबाबत या कार्यालयास विचारणा करण्यात येते. याबाबत खुलासा करण्यात येतो की, नोंदणीकृत मद्याची आयात त्यावरील विशेष शुल्क / वाहतुक शुल्काचा भरणा करुन एफएल-१ मध्ये केल्यावर नोंदणीचा कालावधी संपल्यावर एफएल-१ अनुज्ञप्तीमध्ये शिल्लक असलेला मद्यसाठा संपुष्टात येई पर्यंत कधीही विकता येऊ शकेल. यापुढे या विषयावर मार्गदर्शन मागविण्यात येऊ नये ही विनंती.

15/4/05

3033
१५-३-०५

(मु. आ. पाटील)
सह आयुक्त (मळी व मद्यार्क)
आयुक्तांकरिता

D:\QAIYYUM\magadesh & I balance stock per